कृषि आयुक्तालयांतर्गत भाजीपाला, रोपमळे,फळे रोपमळे, स्थानिक उद्याने या योजनेतील अस्थायी पदे दि.०१ मार्च, २०२६ पासून दि. ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्याबाबत... (एकूण ९२६ पदे)

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः फरोवा-२०२६/प्र.क्र. ४५ /१३-अे**

मंत्रालय विस्तार, हुतात्मा राजगुरु चौक

मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२

दिनांक: १३ मार्च, २०२६

**वाचा :**

१. वित्त विभाग शासन निर्णय क्र. असंक-१००४/प्र.क्र.१२ (भाग-२)/२००४/ वित्तीय सुधारणा-१, दि.०४.१०.२००४
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. फरोवा-२०२५/प्र.क्र.२७/१३ अे, दि. ३० सप्टेंबर,२०२५
३. कृषि आयुक्तालयाचे क्र. कृआ-१११११/साप्र/१७२२/२०२६-२७/प्र.क्र.४/आस्था-५ (निप)/७९ (र), १०.०२.२०२६.
४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि - २०१६/ प्र.क्र. ८ / १६ / आपुक/ दि. २८ फेब्रुवारी, २०२६

**प्रस्तावना :-**

भाजीपाला, रोपमळे, फळे रोपमळे, स्थानिक उद्याने योजनेतील एकूण ९२६ अस्थायी पदांना सदंर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये दि. १ सप्टेंबर,२०२५ ते दि. २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्यात आलेली आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि -२०१६/ प्र.क्र. ८ / १६ / आपुक/ दि. २८ फेब्रुवारी, २०२६ अन्वये प्रशासकीय विभागांच्या त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना, तसेच या पूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु, ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.२८ फेब्रुवारी,२०२६ नंतर मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना दिलेले आहेत. यास अनुसरुन भाजीपाला, रोपमळे,फळे रोपमळे, स्थानिक उद्याने योजनेतील ९२६ अस्थायी पदांना दि.०१ मार्च, २०२६ पासून दि. ३१ ऑगस्ट, २०२६ या कालावधीपर्यंत पुढे चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

१. भाजीपाला, रोपमळे, फळे रोपमळे, स्थानिक उद्याने या योजनेमधील एकूण ९२६ अस्थायी पदांना संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये दि. १ सप्टेंबर, २०२५ ते दि. २८ फेब्रुवारी,२०२६ पर्यंत मुदत वाढ मंजुर करण्यात आलेली आहे. कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये विनंती केल्यानुसार खालील ९२६ अस्थायी पदांना दि. १ मार्च, २०२६ ते दि. ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**तालुका / जिल्हा फळरोप वाटिका( २४०१ १७२२)**

| अ.क्र. | पदनाम | सध्या मंजुर अस्थायी पदे |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र कृषि सेवा वर्ग-२ | १ |
| २ | कृषि अधिकारी (कनिष्ठ( वर्ग-२ | ८ |
| | **वर्ग-३** | |
| ३ | उप कृषि अधिकारी | ११४ |
| ४ | सहाय्यक कृषि अधिकारी | ८६ |
| ५ | वरिष्ठ लिपीक | ० |
| ६ | लिपिक | १२३ |
| ७ | प्रयोगशाळा सहाय्यक | ३ |
| ८ | यंत्रचालक | १ |
| | **वर्ग-४** | |
| ९ | रोपमळामदतनीस/ | ४०९ |
| १० | शिपाई | १२३ |
| ११ | मजूर | ४२ |
| १२ | ट्रिलर ऑपरेटर | १५ |
| १३ | स्वच्छक | १ |
| एकूण | | ९२६ |

२.	या बाबत होणारा खर्च मागणी क्र.डी-३ , २४०१ पीक संवर्धन, ११९ बागायती व भाजीपाला पिके ११९ (०३) रोपमळे (०३)(०१) भाजीपाला रोपमळे, फळ रोपमळे व स्थानिक उद्याने (२४०१ १७२२) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामधील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.असंक-१००४/प्र.क्र.१२(भाग-२)/ २००४/वित्तीय सुधारणा-१, दि.०४ ऑक्टोबर, २००४ तसेच, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि - २०१६/ प्र.क्र. ८ / १६ / आपुक/ दि. २८ फेब्रुवारी, २०२६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३१३१८३३४७२४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LALITKUMAR
RANGNATH
DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.03.13 18:55:52 +05'30'

**( डॉ.ललितकुमार धायगुडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक ( नि. व गु.नि.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
४. सर्व विभागीय कृषि सह संचालक.
५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
८. सह संचालक, लेखा व कोषागारे,संगणक कक्ष,नवीन प्रशासकीय इमारत,५ वा मजला, मुंबई.
९. कक्ष अधिकारी, अर्थसंकल्प/१५ अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती/कार्यासन-१३-अे.